राज्यातील मत्स्य उत्पादनात वाढ करण्यासाठी
पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्याबाबत धोरण.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्र. मत्स्यवि-२०१६/प्र.क्र.९८/पदुम-१३**
**दिनांक: १७ ऑक्टोबर, २०१६**

वाचा:- १) आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचा क्र. मत्स्य/भू/ताम/०२०९०५/२९/२०१६, दिनांक ४.७.२०१६ चा प्रस्ताव.

**प्रस्तावना:-**

राज्यातील कुपोषणाची समस्या हाताळण्यासाठी प्रोटीनयुक्त खादयपदार्थांची उपलब्धता वाढविणेची अत्यंत आवश्यकता आहे. मासे हे प्रोटीनयुक्त खादयपदार्थ म्हणून अतिशय महत्वाचा घटक आहे. राज्यातील मत्स्य उत्पादन वाढीस लागून उच्च प्रतीचे प्रोटीन उपलब्धता वाढविण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभाग प्रयत्नशील आहे. यासाठी बंदिस्त पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन करणे ही उच्च तंत्रज्ञानावर आधारित पद्धत असून, त्याद्वारे प्रति हेक्टरी अधिक मत्स्योत्पादन मिळू शकते. मत्स्यव्यवसाय विभागामार्फत सध्या राज्यामध्ये एकूण २५७९ जलाशय ठेक्याने देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर जलाशयांचे एक टक्के जलविस्तार क्षेत्राचा वापर करून सदर क्षेत्रामध्ये पिंजरा पद्धतीने मत्स्य उत्पादन घेतल्यास ठेक्याने दिलेल्या जलाशयाच्या जलविस्तार क्षेत्रावर ठेकेदाराच्या मासेमारी अधिकारावर कोणतीही बाधा येत नाही व कोणताही विपरीत परिणाम होत नाही. पिंजरा पध्दतीने मत्स्य पालनामुळे मत्स्यबीज उत्पादन, बर्फ कारखाना, मत्स्य खाद्य उत्पादन, कोल्ड स्टोरेज, मत्स्य वाहतूक इत्यादि उद्योगांसाठी चालना मिळून यासाठी उत्पादन व विक्रीसाठी लागणारे कुशल व अकुशल कामगार मिळून जवळपास (३०,०००) लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यास्तव, राज्यातील एकूण उपलब्ध जलाशयांमध्ये पिंजरा पध्दतीने मत्स्योत्पादन प्रकल्प स्थापित करून मत्स्यव्यवसायाकरीता पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी धोरण लागू करण्याच्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

पिंजरा पध्दतीने मत्स्य संवर्धनासाठी मत्स्यव्यवसाय विभागाअंतर्गत ठेक्याने देण्यात येणाऱ्या २०० हेक्टर वरील जलाशयांमध्ये मत्स्यसंवर्धन करण्यास परवानगी देण्यात येईल. पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन विकास संबंधी धोरणाअंतर्गत आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी दरवर्षी आदिवासी विकास विभाग, मानव विकास योजना इत्यादि मधील लाभार्थी, पिंजरा पध्दतीने मत्स्योत्पादन करणाऱ्या संघटना, विविध संस्था, जिल्हा मच्छिमार संघटना, मत्स्यबीज उत्पादक, मत्स्य खाद्य उत्पादक, पिंजरा उत्पादक यांच्यासह कार्यशाळा घ्यावी व त्यादरम्यान या योजनेअंतर्गत इच्छूक गुंतवणूकदार (शासकीय अनुदान व आधारित नसलेल्या) व्यक्ती/संस्था यांच्याकडून वर्तमान पत्रात जाहिरातीद्वारे अर्ज मागवून घेण्याची कार्यवाही करावी.

## १. पिंजरा पध्दतीने मत्स्योत्पादनासाठी जलाशय ठेका देण्यासाठी निविदेबाबत कार्य पध्दती

आयुक्त मत्स्यव्यवसाय राज्यातील पात्र जलाशयांची यादी प्रसिध्द करतील व पारदर्शक पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पात्र व्यक्ती/विविध संस्था यांच्याकडून विहित पध्दतीने निविदा मागविण्यात येतील आणि उच्चतम निविदाधारकास निविदा मंजूर करण्यात येईल. त्यासाठी ठेक्याने देण्यासाठी आकारण्यात येणारी न्युनतम ठेका रक्कम (offset price) १५०० चौ.मि. क्षेत्रात पिंजरा बांधकामासाठी लागणाऱ्या जलक्षेत्राची किंमत प्रथमवर्ष रु.५०,००० इतकी राहिल. यासाठी वेळोवेळी ठेका किंमती ठरविण्याचे व त्यात वाढ करण्याचे अधिकार प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखालील समितीस राहतील सदर समिती स्थापन करण्याचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. सदर प्रक्रिया राबविताना खालील लाभार्थींना प्राधान्य देण्यात येईल.

अ) १००% स्थानिक मच्छिमारांची प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था, १००% स्थानिक आदिवासी मच्छिमारांची प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था तसेच ज्या प्रकल्प ग्रस्ताना पर्यायी शेतजमिन वितरीत करण्यात आलेली नाही किंवा मोबदला देण्यात आलेला नाही अशा १००% प्रकल्पग्रस्तांची प्राथमिक मच्छिमार सहकारी संस्था इत्यादिंना ठेका वितरित करताना अग्रक्रम देण्यात येईल.

(ब) मत्स्यसंवर्धन पिंजऱ्यासाठी अर्ज करतेवेळी प्रकल्प अहवालाप्रमाणे (DPR) अर्जदाराकडे प्रकल्पाकरिता लागणा-या निधीच्या नियोजनाप्रमाणे स्वता:च्या भांडवलाची रक्कम असणे आवश्यक राहील. अर्जदार संस्था असल्यास संस्थेकडे स्वता:च्या भांडवलापोटी राखीव निधी (Reserves & Surplus) असणे आवश्यक राहील. संस्थेकड़े आवश्यक राखीव निधी (Reserves & Surplus) नसण्याच्या परिस्थितीत सभासदांकडून अतिरिक्त भांडवल उभारणे, तसेच नविन सभासदांची नोंदणी करणे, त्यांच्याकडून भागभांडवलाची रक्कम गोळा केल्यावर त्यांना भागभांडवल प्रमाणपत्र दिल्यावर ती संस्था अर्ज करण्यास पात्र ठरेल. स्वता:च्या भागभांडवलामध्ये शासनमान्य वित्तिय संस्थेकडून ( Non-Banking Financial Institution), उदा. SFAC, SIDBI प्राप्त भाग भांडवल (Venture Capital/ Sub-ordinate Loan) व शासकिय योजनेअंतर्गत देय अनुदानाचाही समावेश समजण्यात येईल.

## २. पिंजरा बांधकामाबाबत अटी

प्रकल्पाअंतर्गत एकूण जलाशयाच्या १% क्षेत्र पिंजरा प्रकल्पासाठी संबंधितांच्या ताब्यात देण्यात येईल. याशिवाय पिंजरा बॅटरीचे चारही बाजूने विहित निकषाप्रमाणे आयुक्त मत्स्य यांच्यामार्फत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे मोकळी जागा सोडणे आवश्यक राहिल. या जलक्षेत्रात जास्तीत जास्त ६x४x४ या आकाराचे ४८ केज बांधकाम करणे आवश्यक राहिल.

## ३. कालावधी

पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धनासाठी देण्यात आलेल्या ठेक्याचा सर्वसाधारण कालावधी सात वर्षांचा राहिल. आदिवासी उपयोजना भागात, पेसा अधिनियमातंर्गत असलेल्या भागात व नक्षल प्रभावित तालुक्यात सदर कालावधी आठ वर्षाचा राहिल. सदर कालावधीत तीन वर्ष वाढविण्याचे अधिकार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना राहतील. त्याबाबतच्या अटी शर्ती स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. सदर कालावधीत गुंतवणूकदाराने कर्ज परतफेड न केल्यामुळे प्रकल्प अनुत्पादक मालमत्ता (Non-Performing Asset) जाहीर करण्यात आला असल्यास किंवा ठेकेदाराची मालमत्ता बँकेने जप्त केल्याचे घोषित केल्यास अशा ठेकेदारांना देण्यात आलेल्या पिंजऱ्याचे ठेके रद्द केले जातील.

## ४. बांधकाम

पिंजऱ्याचे जास्तीत जास्त बांधकाम १५०० चौ.मि.इतके मर्यादित ठेवणे बंधनकारक राहिल. पिंजऱ्यामध्ये मत्स्यबोटुकली साठवणूक करण्यासाठी, मत्स्यजिरे ते मत्स्यबोटुकलीत वाढ करण्याकरीता प्रकल्प क्षेत्राच्या जवळ असलेल्या जागामध्ये मत्स्यबीज संवर्धन तलाव बांधकाम करुन घेण्यासाठी आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग यांनी जलयुक्त शिवार योजना व रोजगार हमी योजना (MNREGA) अशा शासकीय योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी आवश्यक पावले उचलणे अपेक्षित आहे. संबंधित ठेकेदारास मत्स्यसंवर्धन तलावामध्ये बोटुकली गोळा करण्यासाठी आऊटलेट दरवाजे (Sluice Gate) बांधणे मत्स्यपिंज-याची नियतकालिक देखभाल करणे इत्यादिची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहिल. प्रकल्प क्षेत्रावर कर्मचारी यांचेसाठी शेड बांधकाम, स्वच्छता गृह बांधकाम इत्यादि तसेच कोणतेही इतर बांधकाम करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करणा-या ठेकेदारांना मत्स्यखाद्य, जाळी, प्रकल्पासाठी लागणा-या साहित्याकरिता, स्टोरेज व कर्मचारी यांच्याकरिता स्वच्छतागृह बांधणे इत्यादी कामाकरिता तसेच, जलाशयामधील पिंजऱ्याकडे जाण्यायेण्यासाठी बिगर यांत्रिकी/यांत्रिकी नौका वापरण्यास परवानगी मिळवून देण्याची जबाबदारी संबंधित सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय विभाग यांच्यावर सोपविण्यात येईल.

## ५. राखीव क्षेत्राव्यतिरिक्त उपलब्ध असलेल्या पिंजरा प्रकल्पाअंतर्गत निविदेमध्ये सूट देण्याची पध्दत-

जलाशयामधील पिंजरा प्रकल्पाअंतर्गत (cages) जलक्षेत्राचा जाहिर निविदा करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि मुद्दा क्र. (१-अ) मध्ये नमुद वर्गवारीतील अर्जदारांना न्यूनतम ठेका रक्कमेमध्ये १०% पर्यंत सूट अनुज्ञेय राहिल. ठेका दिलेल्या अर्जदारांना मिळालेला ठेका पोट-ठेकेदारांना हस्तांतरीत करता येवू नये, याकरिता व्यक्तिगत अर्जदारांनी स्वत:च्या बॅकेचा खाते क्रमांक,पॅनकार्ड नंबर, आधारकार्ड नंबर अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे. तसेच, संस्था

अर्जदार असल्यास, अर्जदार संस्थेनी संस्थेचा पॅन नंबर, बँक खाते नंबर, व संस्थेच्या संचालक मंडळाच्या सर्व सदस्यांचे पॅन नंबर व आधार क्रमांक अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक राहील व प्रवर्तक सदस्य (Promoter Members) यांना ठेक्याच्या मुदतीत संस्थेचे सदस्यत्व सोडता येणार नाही.

## ६. पिंजरा मत्स्यसंवर्धनाच्या कार्यक्रमाद्वारे मिळणा-या महसुलाबाबत कार्यवाही-

पिंजरा मत्स्यसंवर्धन कार्यक्रमाद्वारे मिळणारा महसूल महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्या खाती जमा करावा व त्याचा उपयोग पिंजरा पद्दतीने साठवणूक करण्यासाठी लागणा-या मत्स्यबीज उत्पादनाची सुविधा निर्माण करण्याकरिता तसेच महामंडळाकडे असलेल्या मत्स्यबीज उत्पादन केंद्र व मत्स्यबीज संवर्धन तलाव यांचे बांधकाम अथवा देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

आवश्यकतेनुसार कुशल कामगारांची उपलब्धता वाढविण्याकरिता कौशल्य विकास संबंधी प्रशिक्षण कार्यक्रमावर खर्च करण्याची परवानगी राहील. प्रशिक्षणाच्या वेळेस इतर शैक्षणिक संस्थांमधून प्रशिक्षित वैज्ञानिक यांना प्रशिक्षणासाठी निमंत्रण दिल्यास त्यांना द्यावयाचे मानधन या महसूलामधून महामंडळाने अदा करावे. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी पिंजरा ठेक्याने देण्याची कार्यवाही व जाहीर लिलावामुळे होणा-या प्रसिध्दीचा खर्च इ.,करिता तज्ञांना निमंत्रित केल्यास या कामासाठी महामंडळाने या निधीतूनच खर्च करणे अपेक्षित आहे.

## ७. पिंजरा पदधतीने मत्स्यसंवर्धन करणाऱ्या ठेकेदारांकरिता आवश्यक अटी-शर्ती

अ. पिंजरा पध्दतीने देण्यात आलेले ठेके, उपठेक्याने देण्याची परवानगी देण्यात येणार नाही. ठेका उपठेक्याने दिल्यास त्याचा ठेका रद्द करण्यात येईल.

आ. पिंजरा पध्दतीने देण्यात आलेल्या ठेक्याचे ठेकेदाराने स्वत:च्या पिंजऱ्यामध्ये मत्स्यसंवर्धन करणे बंधनकारक राहील. त्यांनी अधिकार नसताना खुल्या जलाशयामध्ये मासेमारी करु नये. तसे केल्यास त्यांचा ठेका रद्द करण्यात येईल.

इ. पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करणाऱ्या ठेकेदाराने, त्यांच्या पिंजऱ्यावर काम करणाऱ्या कामगारास कामगार कायद्याअंतर्गत किमान वेतनापेक्षा कमी वेतन अदा करु नये, सदर वेतन कामगारांचे बँक खाते काढून त्याला आधारकार्ड UIDAI नंबरचा आधार घेऊन त्यांच्या बँक खातेमध्ये जमा करण्यात यावे. त्यांना कायदेशीर तरतुदी प्रमाणे EPF, ESIS इत्यादी योजनेचा लाभ देणे आवश्यक राहील. तसेच, ठेकेदारांनी त्यांच्या खर्चाने प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजने अंतर्गत सर्व कामगारांचा विमा काढणे बंधनकारक राहील.

ई. ठेकेदाराने त्यांचे व त्यांच्या कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पिंजरा प्रकल्पावर लाईफ सेविंग जॅकेट व इतर प्रथमोपचाराची साधने ठेवणे बंधनकारक राहील.

उ. ठेकेदाराने प्रकल्पाच्या परिसरात बेकायदेशिररित्या कोणत्याही प्रकारचे अवैध कार्यक्रम करु नयेत तसेच प्रकल्पाच्या सुरक्षितेतला बाधा निर्माण होईल, असे कृत्य झाल्यास सदर पिंजरा पध्दतीचा ठेका रद्द करण्यात यईल.

## ८. कुशल कामगार व कौशल्य प्रशिक्षण निर्मितीचा कार्यक्रम-

पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी उच्च तंत्रज्ञानाच्या कुशल कामगार पर्याप्त संख्येत उपलब्ध करुन देण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रम व इतर प्रशिक्षण कार्यक्रमाची सर्व जबाबदारी महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांच्यावर सोपविण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता भारतीय कृषि अनुसंस्थान (ICAR) यांच्या अंतर्गत असलेली संस्था, जसे CIFRI,CIFA इत्यादि, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर (MAFSU) व राज्यातील मत्स्यविज्ञान महाविद्यालय यांची मदत घेण्याची परवानगी राहील. महामंडळाने त्यांनी निर्माण केलेल्या पिंजऱ्याबाबत प्रशिक्षण देण्याची सोय उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

## ९. पिंजरा पध्दतीसाठी जलाशयामधील जलक्षेत्र निवडणे व पाण्याचे पृथककरण करणे

पिंजरा पध्दतीसाठी जलाशयामधील १% जलक्षेत्र निवडणे व पाण्याचे पृथककरण करणे याची जबाबदारी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची राहिल. जलाशयामधील १% जलक्षेत्र निवडणे तसेच पाण्याचे परिक्षण करणे याकरिता भारतीय कृषि अनुसंधान यांच्या अंतर्गत असलेली CIFRI,CIFA इत्यादि, राज्यातील मत्स्यविज्ञान महाविद्यालय, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (MAFSU) यांचे सहकार्य घेण्यात यावे.

## १०. पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी मत्स्यबोटुकली व मत्स्यखाद्य यांची उपलब्धता वाढविणे

मत्स्यबोटुकली, मत्स्यखाद्य यांची उपलब्धता वाढविणेसाठी उत्पादक कंपन्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महाराष्ट्र मत्योद्योग विकास महामंडळ यांच्यावर राहील.

## ११. राज्यामध्ये अवर्षण अथवा अतिवृष्टी या प्रसंगी पिंजरा पध्दतीने ठेकेदारास मिळणारी सवलत

राज्यामध्ये अवकाळी दुष्काळ पडल्यास अथवा अतिवृष्टी झाल्यास महसूल विभागाच्या सन १९७६ च्या तसेच त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या अवर्षण व अतिवृष्टीच्या शासन निर्णयानुसार पिंजरा पध्दतीने मत्स्यसंवर्धन करणाऱ्या ठेकेदारांना १ वर्ष विनामुल्य वाढ देण्यात येईल.

**१२. पिंजरा पध्दतीने ठेक्याने देण्यात आलेल्या ठेक्यामध्ये काही वाद विवाद झाल्यास करावयाची कार्यवाही**

पिंजरा पध्दतीने ठेका देण्याच्या प्रक्रियेत अथवा ठेका दिल्यानंतरच्या कालावधीत कोणताही वाद उद्भवल्यास या वादासंदर्भात आयुक्त मत्स्यव्यवसाय हे अपिलीय प्राधिकारी राहतील तसेच प्रधान सचिव (पदुम) हे पुनर्विलोकन प्राधिकारी राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१७१७३७०३२१०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chitrakala Suryawanshi

Digitally signed by Chitrakala Suryawanshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b61aaca1243458a7300585877d01b18c73211c3f79c97f57bd06e1e79a2a57ae, cn=Chitrakala Suryawanshi
Date: 2016.10.17 18:43:26 +05'30'

**( चि.नि.सुर्यवंशी )**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. र्सव मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र राज्य
६. अप्पर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय मुंबई-३२.
७. प्रधान सचिव (वित्त) मंत्रालय मुंबई-३२.
८. प्रधान सचिव (वने) मंत्रालय मुंबई-३२.
९. प्रधान सचिव (ग्रामविकास) मंत्रालय मुंबई-३२.
१०. सचिव (सहकार) मंत्रालय मुंबई-३२.
११. प्रधान सचिव (आदिवासी विकास) मंत्रालय मुंबई-३२.
१२. प्रधान सचिव (सामाजिक न्याय) मंत्रालय मुंबई-३२.
१३. सचिव (जलसंपदा) मंत्रालय मुंबई-३२.
१४. सचिव (लक्षेवि) मंत्रालय मुंबई-३२.
१५. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. आयुक्त सहकार पुणे
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ,मुंबई

२१. सर्व आयुक्त, महानगरपालिका
२२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ सिंचन भवन पुणे
२३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
२४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
२५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
२६. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे.
२७. सर्व उपायुक्त, मत्स्यव्यवसाय
२८. सर्व विभागीय सहआयुक्त निबंधक सहकारी संस्था
२९. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय मुंबई
३०. सर्व जिल्हा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)
३१. सर्व जिल्हा मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी
३२. महालेखापाल (लेखापरिक्षक/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
३३. वित्त विभाग (व्यय-२) मंत्रालय मुंबई-३२.
३४. सर्व कृषि व पदुम विभागातील कार्यासने/निवड नस्ती